# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ, अधिनियमक्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## पदव्युत्तर शैक्षणिक मराठी विभाग

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली, जि. गडचिरोली

जा.क्र./गोविग/पशैवि/ 116/2025 दि. २५/०९/२०२५

**प्रति,**

**मा. प्राचार्य,**
**सर्व संलग्नित महाविद्यालये,**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**विषय :– विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात स्वयंसिध्दा केंद्रे स्थापन करून नोडल अधिकारी नेमण्याबाबत.**

**संदर्भ :–** राज्यपालांचे सचिवालय, राजभवन मलबार हिल, मुंबई कार्यालयाचे पत्र No.RB/Edn.1/Gen- 2025/798 या क्रमांकाचे २२ सप्टेंबर, २०२५ चे पत्र.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील मा. प्राचार्य यांना सुचित करण्यात येते की, दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या कार्यालयीन पत्राद्वारे मा. राज्यपाल महोदयांनी सामान्य निर्देश प्रसारित केले आहेत. सदर पत्राच्या मुद्दा क्रमांक ३१ वर मा. राज्यपाल महोदयांनी दिले आहेत की विद्यापीठांनी पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांची नोंदणी वाढविण्याचे काम करावे. विद्यापीठ महिला सक्षमीकरण, महिलांच्या क्षेत्रातील संशोधन, सुरक्षितता, लिंग बजेटिंग यावर देखील काम करेल. विद्यापीठ विद्यार्थी स्वयंसेवकाद्वारे महिला स्वयं–गटांना मदत आणि मार्गदर्शन देखील करेल.

वरील बाबी लक्षात घेता स्वयंसिध्दाने महिला सक्षमीकरणासंदर्भात एक उपक्रम सुरू केला आहे, विशेषतः विद्यापीठ विभाग आणि संलग्न महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या मुलींसाठी, आयडब्लूई (महिला सक्षमीकरण संस्था) च्या सहकार्याने SNDT महिला विद्यापीठ ही स्वयंसिध्दा उपक्रमासाठी नोडल विद्यापीठ म्हणून राज्यस्तरीय संस्था आहे. वर उल्लेखित दिनांक २२/०९/२०२५ च्या संदर्भीय पत्रान्वये विद्यापीठ स्तरावर व संलग्न महाविद्यालयांच्या प्राचार्यांना त्यांच्या स्तरावर स्वयंसिध्दि केंद्रे स्थापन करण्यास सांगितले असून स्वयंसिध्दा केंद्रांच्या नोडल समन्वयकांद्वारे 'strishakti.org' सारख्या सोशल मिडिया platform चा वापर करून तयार केलेल्या संबंधित संस्थांमधील सर्व विद्यार्थीनींची नोंदणी करण्यासाठी विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालयांचे स्वतंत्र प्रोफाईल तयार करावे, अशी विनंती करण्यात आलेली आहे.

करीता संदर्भीय पत्राचे अवलोकन करून मा. प्राचार्य यांनी आपल्या महाविद्यालयीन स्तरावर स्वयंसिध्दा केंद्र स्थापन करावे व समन्वयासाठी नोडल अधिकाऱ्याची नेमणूक करून त्यांची माहिती (नाव, महाविद्यालयाचे नाव, मेल आयडी, भ्रमणध्वनी क्रमांक) त्वरीत swayamsiddhagug@gmail.com या मेलवर विद्यापीठाला अवगत करून द्यावी.

**मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये**

[signature]

**डॉ. सविता गोविंदवार**
नोडल अधिकारी, स्वयंसिध्दा केंद्र
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली